Page :
Date : / /

॥ श्री ॥



## • मी बापुडा •

मी बापुडा ओहोळ एक
एकांती झुळझुळणारा
सप्तसुरांच्या मैफिलीत या
गीत अंतरी गुणगुणणारा ...॥

मी अंबरी घनमेघ सावळा
श्रावणमासी झरझरणारा
मी भ्रमर एक बावरा
मधुगंधी फुलांत मिरवणारा ...॥

मी पवन धुंद प्रीत गंधला
ब्रह्मांडातुनी मुक्त उधळणारा
चराचरातील आनंद अवीट
घट उराशी कवटाळणारा ....॥

मी स्वर अबोल अधीर एक
तार वीणेची झंकारणारा
मी रसिक लडिवाळ एक
धून मुरलीची ऐकणारा ...॥

• रचना :- वि. ग. सातपुते (भावकवी)
• दिनांक :- ३० मार्च २०२१

REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA